**आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या अधिपत्याखालील प्रस्तावित ८१६ अस्थायी व १४५ अतिरिक्त पदांना सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या वर्षांकरीता दि.०१.०३.२०२६ ते दि. ३१.०८.२०२६ पर्यंत चालू ठेवण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्र. दुविआ-२०२५/प्र.क्र.१७/पदुम-६**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-३२

**दिनांक :- १८ मार्च, २०२६.**

**वाचा :-** १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.दुविआ-२०२५/प्र.क्र.१७/पदुम ६, दि.२५.०९.२०२५.

२) वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि.२८.०२.२०२६.

३) आयुक्त, दु वि.वि. यांचे पत्र क्र.आदुवि -१५ (९)/अस्थायी पदे /मुदतवाढ/ २०२६-२७/ ६९४, दि.०६.०३.२०२६.

**प्रस्तावना:-**

आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचा-यांच्या एकूण ४०९७ पदांच्या सुधारित आकृतीबंधास शासनाने दि.३०.०८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. सुधारित आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांच्या अखत्यारीतील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाची एकूण ८१६ अस्थायी पदे व १५२ अतिरिक्त पदे दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आयुक्त कार्यालयाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये ८१६ अस्थायी पदांना व १४५ अतिरिक्त पदांना पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देणेबाबत विनंती केलेली आहे.

सद्य:स्थितीमध्ये दि.१०.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला असून सुधारित आकृतिबंध निर्गमित केलेला आहे. मात्र सुधारित आकृतिबंधानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. उदा.नवीन सेवा प्रवेश नियम तयार करणे समायोजन इ. मुळे पदांच्या संदर्भात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी जी स्थिती होती तीच स्थिती सद्य:स्थितीमध्ये आहे.

यास्तव वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार दुग्धव्यवसाय विकास विभागातील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांच्या अखत्यारितील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या प्रस्तावित एकूण **८१६** अस्थायी पदे व **१४५** अतिरिक्त पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यत किंवा दि.१०.१०.२०२४ रोजीच्या सुधारित आकृतिबंधाप्रमाणे समायोजनांची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी पुर्ण होईल त्या तारखेपर्यंत पुढे चालु ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. अस्थायी व अतिरिक्त पदांचा गोषवारा विवरणपत्र **"अ"** मध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेला आहे.

१) प्रस्तावित पदांपैकी सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेली पदे वगळण्यात येतील.

२) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांनी सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर ४०९७ पदांसह सर्व एकूण पदांचा आढावा घेऊन नेमकी किती पदे आवश्यक आहेत, याबाबतची माहिती शासनास सादर करावी.

३) अस्थायी पदांना येत्या दोन ते तीन महिन्यांत रिक्त पदांवर टप्प्याटप्प्याने समायोजित करण्यात यावे. समायोजनाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढ देण्यात येणार नाही.

४) या प्रयोजनार्थ होणारा खर्च सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणक संकेतांक २०२६०३१८१५४९२१४७०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RANDHIR DATTA SURYAWANSHI

Digitally signed by RANDHIR DATTA SURYAWANSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and ADF Department, 2.5.4.20=26F8F5ACD62C6C81CBBF4ADE82E5A69A52233D9FDDE86D1600DEAC988BF231F7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=97FBF2B8BE63A470F6483AEC6D4B0E42613AB19BFD9A6CC71592ECC9150571D5, cn=RANDHIR DATTA SURYAWANSHI
Date: 2026.03.18 15:50:36 +05'30'

**(रणधीर सुर्यवंशी)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत :- विवरणपत्र "अ"**

**प्रति,**

१) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-१८
२) जनसंपर्क अधिकारी, आ. दु. वि. कार्यालय, वरळी, मुंबई
३) उपायुक्त (प्रशासन), आ. दु. वि. कार्यालय, वरळी, मुंबई
४) उप आयुक्त(वित्तीय सल्लागार), आ. दु. वि. कार्यालय, वरळी, मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा अनुज्ञेयता लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
६) अधिदान व लेखाधिकारी,बांद्रा (पूर्व) मुंबई-५१.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-१८.
८) प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी.
९) सर्व शासकीय दूध योजना.
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी.
११) सर्व प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी.
१२) सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी.
१३) आयुक्त पशुसंवर्धन पुणे / निबंधक, सहकारी संस्था, पुणे.
१४) व्यवस्थापक, पशुपैदास व संगोपन केंद्र पालघर, जिल्हा-पालघर
१५) अतिरिक्त आदिवासी आयुक्त नाशिक.
१६) जिल्हाधिकारी व उप आदिवासी आयुक्त, ठाणे.
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
१८) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास प्रकल्प शहापूर/जव्हार, जि.ठाणे.
१९) वित्त विभाग व्यय-२ / वित्त विभाग ( वित्तीय सुधारणा)
२०) कार्यासन क्रमांक पदुम-१६
२१) निवड नस्ती.

(शासन निर्णय क्र.दुविआ-२०२६/प्र.क्र.२३/पदुम-६, दि. १८ मार्च, २०२६ सोबतचे विवरणपत्र "अ")

| अ.क्र. | कार्यालय/योजनेचे नांव | दि.२८.०२.२०२६ पर्यंत पदांना मंजूरी प्राप्त | | दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मंजूरी आवश्यक पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | अस्थायी | अतिरिक्त | अस्थायी | अतिरिक्त |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शासकीय दूध योजना, अहमदनगर व शित. केंद्र, अकोले, ब्राम्हणवाडा, तिसगांव, राजूर, जामखेड, नारायणगव्हाण | १४ | १ | १४ | १ |
| २ | शासकीय दूध योजना, वणी व शासकीय शितकरण केंद्र | ६ | - | ६ | - |
| ३ | शासकीय दूध योजना, धुळे व शासकीय शित. केंद्र, तळोदा, नंदूरबार व साक्री | १८ | - | १८ | - |
| ४ | शासकीय दूध योजना, चाळीसगांव | १ | - | १ | - |
| ५ | शासकीय दूध योजना, नाशिक व शासकीय शितकरण केंद्र, चांदवड | ६ | - | ६ | - |
| ६ | शासकीय दूध योजना, परभणी व शासकीय शितकरण केंद्र, गंगाखेड, हिंगोली | ७ | ६ | ७ | ६ |
| ७ | शासकीय दूध योजना, छत्रपती संभाजीनगर व शितकरण केंद्र, कन्नड, जालना, वैजापूर, सिल्लोड | २१ | ६ | २१ | ६ |
| ८ | शासकीय दूध योजना, भूम व शासकीय शितकरण केंद्र, परांडा | ७ | ५ | ७ | ५ |
| ९ | शासकीय दूध योजना, नांदेड व शितकरण केंद्र, नरशी | १० | १२ | १० | १२ |
| १० | शासकीय दूध योजना, बीड व शितकरण केंद्र, आंबेजोगाई, केज, माजलगांव | १२ | ११ | १२ | ११ |
| ११ | शासकीय दूध योजना, उदगीर व शितकरण केंद्र, धाराशीव, उमरगा, मुरुड, निलंगा | २४ | १८ | २४ | १८ |
| १२ | शासकीय दूध योजना, नांदुरा व शितकरण केंद्र, मातोळी, चिखली, खामगांव | ३ | - | ३ | - |
| १३ | शासकीय दूध योजना, अकोला व शासकीय शितकरण केंद्र, वाशिम | १८ | - | १८ | - |
| १४ | शासकीय दूध योजना, अमरावती व शितकरण केंद्र, परतवाडा | ६ | - | ६ | - |
| १५ | शासकीय दूध योजना, यवतमाळ व शितकरण केंद्र, पुसद, मारेगांव | ४ | - | ४ | - |
| १६ | शासकीय दूध योजना, गोंदिया व शितकरण केंद्र, भंडारा, तुमसर, कोहमारा, सातगांव | १९ | - | १९ | - |
| १७ | शासकीय दूध योजना, चंद्रपूर व शितकरण केंद्र, नागभिंड, | १५ | - | १५ | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कन्हेरी | | | | |
| १८ | शासकीय दूध योजना, वर्धा व शासकीय शितकरण केंद्र, मनसर | १७ | - | १७ | - |
| १९ | शासकीय दूध योजना, मिरज व शितकरण केंद्र, जत, शिराळा | ४९ | ३ | ४९ | ३ |
| २० | शासकीय दूध योजना, पुणे व शितकरण केंद्र, ओतूर, इंदुरी (मावळ) | ९ | ९ | ९ | ७ |
| २१ | शासकीय दूध योजना, महाबळेश्वर व शितकरण केंद्र, | ५ | - | ५ | - |
| २२ | शासकीय दूध योजना, सोलापूर व शितकरण केंद्र, बार्शी, अकलूज, सांगोला | ५ | - | ५ | - |
| २३ | शासकीय दूध योजना, सातारा व शितकरण केंद्र, वडूज, पारगांव, फलटण | १४ | १ | १४ | १ |
| २४ | शासकीय दूध योजना, महाड | ६ | - | ६ | - |
| २५ | शासकीय दूध योजना, रत्नागिरी व शितकरण केंद्र, सडवली, लांजा | ८ | - | ८ | - |
| २६ | शासकीय दूध योजना, चिपळूण | ३ | - | ३ | - |
| २७ | शासकीय दूध योजना, कणकवली व शितकरण केंद्र, कोलगांव | ८ | - | ८ | - |
| २८ | शासकीय दूध योजना, खोपोली | २ | - | २ | - |
| २९ | शासकीय दूध शितकरण केंद्र, सरळगांव | ६ | - | ६ | - |
| ३० | पशुपैदास व संगोपन केंद्र, पालघर | ५ | - | ५ | - |
| ३१ | प्रकल्प अधिकारी, दापचरी व शितकरण केंद्र, दापचरी | २३ | १ | २३ | १ |
| ३२ | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (सर्व) | ३० | - | ३० | - |
| ३३ | २९ जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालये | ७२ | - | ७२ | - |
| ३४ | बिगर आदिवासी क्षेत्रात दुग्धव्यवसाय जास्तीत जास्त चालना देण्याच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेली आघाडी पथके | १ | - | १ | - |
| ३५ | आदिवासी क्षेत्रात दुग्धव्यवसायात जास्तीत जास्त चालना देण्याच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेली आघाडी पथके योजना | १२ | - | १२ | - |
| ३६ | दुग्धव्यवसाय विकास विभागातील वैयक्तिक पदे | १५ | - | १५ | - |
| ३७ | आयुक्त कार्यालय, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी | ३५ | - | ३५ | - |
| ३८ | बृहन्मुंबई दूध योजना, आरे/वरळी/कुर्ला | २३३ | ७८ | २३३ | ७३ |
| ३९ | नियंत्रक, गुरे नियंत्रण कार्यालय, गोरेगांव | ११ | - | ११ | - |
| ४० | प्राचार्य, दिन दयाळ उपाध्याय दुग्ध विज्ञान संस्था, आरे | १२ | - | १२ | - |
| ४१ | मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई. | ४४ | १ | ४४ | १ |
| | एकूण | ८१६ | १५२ | ८१६ | १४५ |

RANDHIR DATTA SURYAWANSHI

Digitally signed by RANDHIR DATTA SURYAWANSHI
Date: 2026.03.18 15:50:55 +05'30'

**( रणधीर सुर्यवंशी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**